INDIA NEWS COMMUNICATIONS

| PUBLICATION | EDITION | DATE |
|---|---|---|
| Sindhudurg Samachar | Goa | 23/05/2017 |

# 'कामधेनू एनएक्सटी'चे गोव्यात आगमन



**पणजी/प्रतिनिधी :**

पायाभूत विकासाच्या विश्वामध्ये एका नव्या आयामाची भर घालत, 'कामधेनू लिमिटेड' यांनी या उद्योगाच्या वाढीमध्ये एका नव्या मैलाचा टप्पा समाविष्ट केला असून गोव्याच्या बाजारपेठेत नवीन उच्च दर्जाचे इंटरलॉक स्टील दाखल केले आहे. औद्योगिक उत्पादन निर्मितीमध्ये प्रागतिक मॉडेलवर काम करुन कंपनीने हे साध्य केले आहे. अतुलनीय शक्ती, परिपूर्ण क्षमता, अचूक भौतिक आणि रसायनिक गुणधर्म, प्रगत डबल रिब डिझाईन आदी 'कामधेनू'चे विशेष गुण आहेत. कंपनीने भरपूर संशोधन करुन ते अस्तित्वात आले आहेत. हे भव्य उत्पादन रिएन्फोर्समेन्ट संरचनामध्ये वापरल्या जाणाऱ्या अन्य सामान्य स्टील बार्सच्या तुलनेत २.५ पट उत्तम आणि भक्कम पकड देते अशी माहिती कंपनीने येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

'कामधेनू लिमिटेड' आपली नाविन्यपूर्णता आणि रिएन्फोर्समेन्ट संरचना उभारण्यासाठी सर्वाधिक दर्जेदार उत्पादनांच्या निर्मितीसाठी योगदान देण्याकरीता नावाजलेली आहे. हे पुढच्या पिढीचे इंटरलॉक स्टील भूकंपामध्ये उच्च संरचनांना अधिकतम सुरक्षितता देऊन त्यांना पूर्णपणे भूकंपरोधक बनवते. यासाठी त्याचा वापर योग्य काँक्रिट मिक्ससोबत करावा लागतो. हा उत्तमप्रकारे डिझाईन केलेला स्टील, बारमध्ये दोन गोलाकार रिब्ज असतात, जे स्टील आणि काँक्रिटमधील इटरलॉकचा भक्कमपणा द्विगुणित करतात असे यावेळी सांगण्यात आले. गगनचुंबी संरचना आजच्या औद्योगिक विकासाची गरज बनल्यां आहेत. म्हणूनच 'कामधेनू एनएक्सटी' भरपूर संशोधनाअंती तयार झाले आहे, जेणेकरुन पुढच्या पिढीतील संरचनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची ताकद आणि भक्कमपणा मिळेल असे या पत्रकार परिषदेत कंपनीचे संचालक श्री सुनिल अगरवाल यांनी सांगितले.